स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पुर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 305.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./. /23-24**
**दिनांक :** २८/०४/२०२५

## वसई विरार शहर महानगरपालिकेत 'सेवा हक्क दिवस' साजरा

"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५" च्या अंमलबजावणीस १० वर्षे पूर्ण झाल्याने या दशकपुर्तीचे औचित्य साधून वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने आज दि.२८ एप्रिल २०२५ रोजी महानगरपालिकेत 'सेवा हक्क दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मा.आमदार श्री.विलास तरे, मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.उप-आयुक्त श्रीमती अर्चना दिवे, मा.उप-आयुक्त श्री.सुभाष जाधव तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिका मुख्यालयात 'आपले सरकार सेवा केंद्राचे' उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. दशकपूर्तीचे औचित्य साधून सेवा हक्क दिनानिमित्त सेवेची बांधिलकी मानणारी शपथ यावेळी उपस्थितांमार्फत घेण्यात आली.

सदर कार्यक्रमात मा.उप-आयुक्त श्रीमती अर्चना दिवे यांनी लोकसेवा हक्क बाबत माहिती देताना सांगितले कि, सर्व नागरिकांना महानगरपालीकेद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा विहित मुदतीत मिळण्यासाठी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत ७१ सेवा वसई विरार शहर महानगरपालिकेद्वारे अधिसूचित केलेल्या आहेत या ७१ सेवांपैकी ५१ सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्यात येत असून उर्वरित २० सेवा ऑनलाईन करण्याचे काम सुरु आहे. या सर्व सेवांचा तपशील महानगरपालिकेच्या vvcmc.in या वेबसाईटवर देण्यात आलेला असून या वेबसाईट वरून तसेच आपले सरकार सेवा पोर्टलवरून नागरिक अर्ज करू शकतात तसेच नागरिकांच्या सुविधेसाठी महानगरपालिका मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालयामध्ये नागरिकांना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यात आले आहेत.

यावेळी मा.आमदार श्री. विलास तरे यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले कि, नागरिकांना मुदतीत सेवा देण्याचा फायदा हा नागरिकांसोबतच शासकीय यंत्रणेलाही होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी आत्मसात करून सर्व नागरिकांना विहित मुदतीत सेवा देण्याचा प्रयत्न करावा.

मा.आयुक्त महोदयांनी यांनी यावेळी सांगितले कि, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम हा नागरिकांना चांगल्याप्रकारे विहित मुदतीत सेवा देणे कामी तसेच लोककल्याणकारी राज्याची संकल्पना राबविणे कामी अतिशय महत्वाचा कायदा असून याची अंमलबजावणी करताना प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी या कायद्यातील तरतुदींचे पूर्ण आकलन करून नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही अशा प्रकारे नागरिकांना विहित मुदतीत चांगल्या सेवा द्याव्यात.

यावेळी लोकसेवा देताना उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांमार्फत राष्ट्रगीताचे गायन करून सदर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

मुख्य कार्यालय विरार

वसई विरार शहर महानगरपालिका